Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# पंडित जवाहरलाल नेहरु : राज्यकारभारातील योगदान

डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार
M.A., M.Ed, NET, SET, Ph.D.(Hist.)
रा. वसमत जि. हिंगोली

## प्रस्तावना

आधुनिक भारताच्या इतिहासात आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणुन पंडित जवाहरलाल नेहरु ओळखले जातात. पंडित नेहरु हे स्वातंत्र्य भारताचे सैनानी होते. त्यांनी इ.स. १९२१ ते इ.स. १९४५ या २४ वर्षात एकुण नऊ वर्षे तुरूंगात काढली. भारताला स्वातंत्र मिळून देणे हे साध्य नसुन भारताच्या सर्वागीण विकासाच्या प्रगतीचे ते साधन आहे. हे लक्षात घेऊन स्वतंत्र भारताला कोणत्या मार्गाने वाटचाल करावी लागेल. याचा खोलवर विचार पंडित नेहरुनी केला होता. भारताला स्वातंत्र्य मिळण्यपुर्वी भारताचे परराष्ट्र धोरण कोणत्या तत्वावर असेल याबाबत ठराव मांडला होता. आजही राज्यकारभाराची वाटचाल त्यांच्या तत्वावरच सुरु आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात मुलभुत हक्क आणि आर्थिक धोरण याबाबत त्यांनी तत्व आणि धोरणे ठरवली होती. हे त्याची कला म्हणजे साम्राज्य शाही विरुद्ध विराट चळवळ आखणी केली गेली होती.

## विषय निवडणेचा हेतु

प्रस्तुत विषय निवडणेचा हेतु हा पंडित जवाहरलाल नेहरु याचा स्वातंत्र्योत्तर भारतात त्याच्या विचारसरणीचा देशांच्या अंतर्गत विकासास किती महत्वपुर्ण भुमिका घेतली त्यांची मांडणी करणे.

## गृहितके

१) पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय बाबतीत भुमिकेचा अभ्यास करणे.

२) भारताला आर्थिक, भौतिक समृद्धी देण्यासाठी पंडित नेहरु यांच्या विचारांचा अभ्यास करणे.

३) तटस्थ राष्ट्राच्या भुमिकेतुन राष्ट्र निर्माण करणे या धोरणाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंध करिता, ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करुन शोधनिबंधाची मांडणी करण्यात येणार आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधने,इंटरनेट इ. उपयोग, शोधनिबंध मांडणी करण्याकरिता उपयोग केलेला आहे.

**१) जनसामान्याच्या प्रेमाचे प्रतिक**

'स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान या नात्याने पं. नेहरुंनी नियतीने टाकलेल्या जबाबदारीची जाणीव देशबांधवांना दिली आणि त्यानंतर दीड दशकाहुन अधिक काळ पंडितजीच्या हाती पंतप्रधान पदाची सुत्रे होती या काळात त्यांचे यश व अपयश मोजताना त्यांच्या व्यक्तिमत्वाचाही मागोवा घेतला पाहिजे. भारतीय जनतेने पंडितजी वर जेवढे प्रेम केले तेवढे आधुनिक काळात कोणावर केले नाही गांधीनी हे महात्मा म्हणुन लोकांना आदरणीय वाटत, तर पंडितजी हे त्याच्या प्रेमाचे विषय होते. भारताचा शोध घेत पंडित नेहरु देशभर भ्रमण करतात तेव्हा या देशाच्या विविधतेतील एकतेने हरवुन जात आणि या पर्यटनाने त्यांना मानसिक सामर्थ्य प्राप्त होत असे. जनतेचे असामान्य प्रेम जिंकणारा हा नेता सर्वसाधारण भारतीयांच्या भावना, कल्पना व संस्कार या पासुन अनेकदा दुर असावयाचा आपल्या सभेला लाखोची गर्दी झालेली पाहुन पंडित नेहरुंना उत्साह वाटे.'[१] आज होणारे सभेला गर्दी आणि आज सभेला जाण्यासाठी अनेक वाहने आहे पण त्या काळात लोक मैल न मैल चालत पायाने जात हे पंडित नेहरुंवरिल प्रेमाचे प्रतिक होते ते सामान्य जनात जाऊन लोकाच्या भावनाचा विचार करत होते. त्याच्या सामान्य जनतेबद्दल उदात प्रेम ही एक राज्यकारभाराची नाजुक कला होती.

**२) निवडणुक मोहीम व इ.स. १९५२ चे निकाल परिणाम**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु हे तब्बल १७ वर्षे अखंडपणे पंतप्रधान पदावर विराजमान होते. या कालखंडाना आधुनिक भारताच्या इतिहासात 'नेहरुपर्वा' असे म्हटले जाते. भारत देशात स्वतंत्र्यानंतर प्रथम निवडणुका लागल्या भारतासमोर अज्ञान, गरिबी, बेरोजगारी, रोगराई यांनी घेरलेल्या आणि प्रातिक, भाषिक, धार्मिक व जातीय अस्मिता कमालीच्या

टोकदार असलेल्या देशाच्या नवरचनेसाठी ते उदंड संस्थारुप भांडवल निर्माण करुन ठेवले होते. 'इ.स. १९५२ चे निवडणुक निकाल यांच्या परिणामी आर्थिक व सामाजिक बाबतीसंबंधात नेहरु यांच्या विचारात जी नवी जाणीव निर्माण झाली होती. तिचे स्पष्ट प्रतिबींब नवे मंत्रीमंडळ बनविल्यापासुन एका आठवड्याच्या आत त्यांनी नियोजन मंडळाला जो आदेश दिला, त्यात पडले. इतर कुठल्याही कारणामुळे सोडा पण केवळ तिच्या पुरोगामित्वाच्या गुणामुळे, पहिली पंचवार्षिक योजना ते एक उदीपित करणारे साहस होते पण तो प्रामुख्याने एक पुर्व तयारीवजा पर्यटन, अग्रक्रमांचा सर्वसाधारण निर्देश करणारा प्रकल्पसंग्रह होता ती तयार झाल्यावर दोन वर्षाच्या अवधित पहिल्या योजनेचा हेतु पार पाडलेला होता.'[२]

**३) राज्यातंर्गत व्यक्तिची स्थिती तसेच महत्व**

पंडित नेहरु यांनी व्यक्तिची स्थिती हे राजकीय विचारांचे केंद्र आहे. जर ते राज्याची कल्पना करतात तर ते या केंद्रासाठी आहे. व्यक्तिच्या आर्थिक विकासासाठी ज्याच्या सावलीत स्वातंत्र्याचे रोपटे सकुशल फुलते लोकशाही फक्त निवडणुकीची व्यवस्था नाही. ही एक अशी जीवनातील विद्या देखील आहे. ज्यामुळे व्यक्तिच्या सर्जनात्मक प्रवृत्ती विकसित होऊ शकता. स्वातंत्र्य मनुष्याच्या नैतिक विकासाची पहिली गरज आहे. त्याच्या शिवाय व्यक्तिच्या आंतरिक क्षमतेचा विकास करु शकत नाही. इ.स. १९३६ मधील लखनो कॉंग्रेस अधिवेशनात विचार व्यक्त केले. 'जगातील तसेच भारतातील समस्या सोडविण्यासाठी गुरुकिल्ली समाजवादातच सापडू शकेल या विषयी माझी खात्री होऊन चुकली आहे. मी जेव्हा समाजवाद शब्द वापरतो. तेव्हा मोघम समाजवादी अर्थाने वापरत नसुन त्यामध्ये निश्चित असा शास्त्रीय आर्थिक आशय मला अभिप्रेत असतो. यापुढे जाऊन असे म्हणता येईल की समाजवाद ही संकल्पना केवळ आर्थिक सिध्दांतापुरती मर्यादीत नसुन हे एक जीवनाचे तत्वचिंतन आहे. आणि या दृष्टीने त्याचे मला आकर्षण वाटते. भारतीय जनतेचे दारिद्रय, प्रचंड बेकारी यांचे निर्मुलन करण्याचा मार्ग समाजवादाशिवाय अन्यन्न कोठे सापडु शकेल असे मला वाटत नाही.'[३]

### ४) आर्थिक समस्यावर लक्ष केंद्रीत

पंडित जवाहरलाल नेहरु यांनी इतर गौण बाबीकडे दुर्लक्ष करुन आर्थिक समस्यांवर लक्ष केंद्रीत करुन आर्थिक शिस्तीचा अभाव संपण्यासाठी त्यांनी कौशल्यपुर्ण विकासाचे नियोजन केले. 'आर्थिक नियोजनाचा स्विकार व औद्योगिकरणाचा पुरस्कार करुन पं. नेहरुंनी भारतात आधुनिक युगास प्रारंभ केला. या देशाच्या दारिद्रयावर औद्योगिकरण व किफायतशीर शेती हाच तरणोपाय आहे. हे दादाभाई रानडे यांच्याप्रमाणे पंडित नेहरुंनी ओळखले होते.'[४] भारत स्वातंत्र झाला होता भारतात अनेक गंभीर प्रशन डोकेवर काढुन बसलेले होते. मागासलेल्या देशात आर्थिक नियोजन यशस्वी करतांना लोकशाही पध्दती सक्ती करावी लागले. संसदीय लोकशाही व्यवस्थेचा स्विकार देशाने करावा म्हणुन पंडित नेहरुंनी धरलेला आग्रह आणि वेगवेगळया क्षेत्रातील नेते व तज्ञ यांना एकत्र आणुन निर्माण केलेले संविधान हे देशाला मिळालेला महान ठेवा आहे.

### ५) पंडित नेहरु  आणि सामान्य जनता एकजुट

'माणसांना हाताळण्याची ही कला पंडित जवाहरलाल नेहरुंना प्रत्येक पातळीवर उपयोगात आणावी लागली. जनतेचे शासनाशी नाते जोडण्याच्या जास्त विशाल, अवैयक्तिक पातळीवर, तसेच त्याच्या सहकाऱ्यांची एकजुट कायम राखण्याच्या जास्त नाजुक कामाच्याही पातळीवर अशा दोन्ही स्तरांवर पंडित नेहरुंना त्यांच्या या कलेचा वापर करावा लागला.'[५] ग्रामीण हितसंबंध जोपसणा करणे हा त्याच्या मागे हेतु होता धर्मनिरपेक्ष भावना टिकुन ठेवणे विकासाची बीज पेरणी करणे हा त्याचा मनोध्येय होते. हे मनोध्येय त्याच्या आलिप्ततावादी चळवळीतुन सुध्दा परराष्ट्र धोरणातुन त्यांनी मांडणी केली त्यांचे तटस्थ हे धोरण भारतीय लोकांना मिळलेली देणगी होय. या तटस्थ भुमिकेतुन सुध्दा भारत हा इतर देशासोबत मैत्रीपुर्ण भुमिकेतुन उभा राहिला धर्मनिरपेक्ष, समाजवादी, लोकशाही भारतावर प्रेम करणारे बहुसंख्य भारतीय या कठीण परिस्थिती प्रेरणा घेण्यासाठी पंडित नेहरुकडेच आशेने पाहत आहेत.

### निष्कर्ष

पंडित नेहरु आणि राज्यकारभारासाठी योगदान या विषयावरील हा शोधनिबंध पंडित नेहरुंचे भारतीय लोकांकरिता केलेले योगदान आणि भारतीयाच्या मनात पंडित नेहरुबदल आदर

याची नाडी आहे. नेहरुंनी राज्यकारभारात अनेक समस्यातुन मार्ग काढत भारत निर्माण करण्याचे बिज पेरुन आधुनिक भारताचे ते शिल्पकार त्याचे यशस्वी कार्याचा गौरव आहे. आस्थिर कश्मीर प्रश्न, राज्यघटना निर्मिती भाषावर प्रांतरचना, नियोजन, आर्थिक शिस्तीच अभाव, ग्रामीण हितसंबंध शाबुत ठेवण्यासाठी केलेले कार्य आणि महत्वाचे कार्य म्हणजे परराष्ट्र धोरण यातुन तो साकारला गेला आहे. भारतीय राजकारणात नेहरुच असे एक नेते होते. जे लेखक म्हणुन आणि विचारक म्हणुन विख्यात झाले. ज्या-ज्या वेळी ते तुरुगांत असत त्या-त्या वेळी नेहरुंनी भरपुर लिखाण केले. ते भारतीय हितासाठी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरु याचे आर्थिक, औद्योगिक, वैज्ञानिक, शैक्षणिक आंतरराष्ट्रीय धोरण हे मुलभुत अलौकिकच कार्य आहे.

**संदर्भ**

१) गोविंद तळवलकर (१९८९) नवरोजी ते नेहरु, मॅजेस्टिक प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, मुंबई, पु. २३३

२) पुरुषोत्तम आत्माराम चित्रे (१९९४) (संपा) जवाहरलाल नेहरु, साहित्य अकादेमी, प्रथम आवृत्ती, नवी दिल्ली, पु. २८०

३) डॉ. स.रा. गाडगीळ (१९९४) नवभारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरु, शलाका प्रकाशन, प्रथम आवृत्ती,पु.३५१, ३५२

४) गोविंद तळवलकर (१९८९) नवरोजी ते नेहरु, मॅजेस्टिक प्रकाशन, द्वितीय आवृत्ती , मुंबई, पु. २४८

५) पुरुषोत्तम आत्माराम चित्रे (१९९४) (संपा) जवाहरलाल नेहरु, साहित्य अकादेमी, प्रथम आवृत्ती, नवी दिल्ली, पु.२८९